नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १९४ Issue - 194 | वार गुरुवार दि. ४ डिसेंबर २०२५ Blow- Thursday Date 4 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

कोब्रा सुरक्षा दलाकडून १२ नक्षलवाद्यांचा खात्मा

छत्तीसगडमध्ये भीषण चकमकीत तीन जवान शहीद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी एकीकडे नक्षलमुक्त भारत अभियान सुरू केले असून महाराष्ट्राच्या गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलवाद्यांचे समर्पण करुन घेण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यश आले आहे. गेल्याच महिन्यात त्यांच्या उपस्थितीत नक्षलवाद्यांचा कमांडो आणि मोठं बक्षीस असलेल्या नेत्याने संविधान हाती घेत नक्षल चळवळीला रामराम ठोकला.

देवेंद्र फडणवीस यांनीही नक्षलमुक्त महाराष्ट्राच्या दृष्टीने पाऊल टाकलं आहे. मात्र, अद्यापही छत्तीसगडमध्ये नक्षलवादी, माओवाद्यांच्या कारवाया सुरूच असल्याचं दिसन येतं. आज सकाळपासूनच छत्तीसडच्या बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यात झालेल्या चकमकीत १२ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आलं असून ३ जवानही शहीद झाल्याची घटना घडली आहे.

छत्तीसगडमध्ये सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक सुरू असून १२ नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाच्या जवानांना यश आले आहे. मात्र, या चकमकीत सुरक्षा दलांचे ३ जवान शहीद झाले आहेत. छत्तीसगडमधील बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमारेषेवर पश्चिम बस्तर डिव्हिजन क्षेत्रात छत्तीसगड पोलिसांचे डीआरजी पथक आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक सुरू आहे. सायंकाळपर्यंत मिळालेल्या माहितीप्रमाणे १२ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा दलाच्या जवानांना यश आले आहे. मात्र, डीआरजीचे तीन जवान ही या चकमकीत शहीद झाले आहे. संपूर्ण परिसराला सुरक्षा दलांनी घेराव घातले असून सर्च ऑपरेशन सुरू आहे. या घटनेनंतर सुरक्षा दलाचे जवान अधिक सतर्क झाले असून विजापूर जिल्हा मुख्यालयातून रिइनफोर्समेंट पाठवण्यात आले आहे. आतापर्यंतचे सर्च ऑपरेशनमध्ये घटनास्थळावरून नक्षलवाद्यांच्या अनेक एसएलआर आणि इंसास रायफल तसेच थ्री नॉट थ्री बंदुका सुरक्षा दलाने जप्त केल्या आहेत. दरम्यान, नक्षलवद्यांशी लढताना शहीद झालेल्या जवानांमध्ये मोनू वडाळी, दुकारु गोंडे आणि रमेश सोडी या तिघांचा समावेश आहे.

दरम्यान, गेल्याच महिन्यात आंध्र प्रदेश, ओडीसा, छत्तीसगड या तीन राज्यांच्या सीमेवर आंध्रप्रदेश पोलिसांच्या ग्रे हाउंड या विशेष पोलिस पथकाच्या कारवाईमध्ये ६ माओवाद्यांचा खात्मा झाला होता. जवानांकडून करण्यात आलेल्या कारवाईत ६ माओवादी मारले गेल्याची माहिती समोर आली. त्यामध्ये मेट्टुरी जोगाराव उर्फ टेक शंकर हा केंद्रीय समिती सदस्य, तसेच डिव्हीसीएम असलेल्या सीता उर्फ ज्योती या २ मोठ्या माओवादी नेत्यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत इतर ४ माओवादी ही या चकमकीत मारले गेल्याची माहिती आहे.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकांआधी महानगरपालिकांच्या निवडणुका?

आयोगाने बोलावली आज महत्वाची बैठक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्य निवडणूक आयोगाने दुसऱ्या टप्प्यात राज्यातील महानगरपालिका निवडणुका घेण्यासाठी हालचाली सुरु केल्याची माहिती आहे. येत्या १५ ते २० डिसेंबरदरम्यान राज्य निवडणूक आयोगाकडून आगामी निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला जाऊ शकतो. त्यात जिल्हा परिषद निवडणुकांआधी २९ महानगरपालिकांसाठी आधी निवडणूक जाहीर होऊ शकते.

राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली आहे. त्यामुळे आरक्षणाच्या या घोळामुळे निवडणूक आयोगाला महापालिका निवडणूक आधी घेणं सोयीस्कर वाटत असल्याची माहिती आहे. यासंदर्भात आज राज्य निवडणूक आयोगाने २९ महापालिकांच्या आयुक्तांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत महानगरपालिकांमध्ये निवडणुकीची कितपत तयारी झाली, याचा आढावा घेतला जाणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगानं आलेल्या हरकती आणि अडचणींबाबत महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे. या बैठकीला मुंबई महापालिकेचे आयुक्त उपस्थित असतील. तर दोन दिवसांपूर्वी निवडणूक आयोगानं सर्व पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेतली होती. यामध्ये सर्व पक्षांकडून घेण्यात आलेल्या अनेक हरकतींनंतर आज ही बैठक बोलावण्यात आली आहे.

महानगरपालिका निवडणुका घेण्यासाठी हालचाली सुरु

राज्य निवडणूक आयोगाने दुसऱ्या टप्प्यात राज्यातील महानगरपालिका निवडणुका घेण्यासाठी हालचाली सुरु केल्याची माहिती आहे. राज्यातील २० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली गेली आहे. तर राज्यातील २९ महानगरपालिकांचा विचार करता फक्त चंद्रपूर आणि नागपूर मनपात आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाले आहे. तुलनेत जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षणाचा घोळ जास्त आहे. त्यामुळे आता निवडणूक आयोगाला २७ महानगरपालिकांच्या निवडणुका आधी घेणे सोयीस्कर वाटत असल्याने त्यादृष्टीने हालचाली सुरु झाल्याचे सांगितले जात आहे. त्यासाठी ४ नोव्हेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगाने २९ महानगरपालिकांच्या आयुक्तांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत महानगरपालिकांमध्ये निवडणुकीची कितपत तयारी झाली, याचा आढावा घेतला जाणार आहे.

एका दिवसात एकूण १९५८ हरकती सूचना नोंदी मुंबई महापालिकेकडे दाखल करण्यात आल्या आहेत. ३ डिसेंबरपर्यंत हरकती सूचना नोंदविण्याचा शेवटचा दिवस होता. तर अंतिम यादी १० डिसेंबरला जाहीर केली जाणार आहे. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला जाहिर करण्यात आलेल्या प्रारुप मतदान यादीवर बुधवार ३ डिसेंबरपर्यंत ७४५२ हरकती सूचना नोंद झाल्या आहेत.

विराट कोहलीचे रेकॉर्ड ब्रेक शतक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

रायपूर : रायपूरच्या मैदानावर भारत आणि दक्षिण आफ्रिका दुसऱ्या वनडे सामन्यात विराट कोहलीनं पुन्हा एकदा दमदार कामगिरी करत सलग दुसरे शतक झळकावलं आहे. रांचीतील पहिल्या सामन्यातील शतकानंतर रायपूरमध्येही कोहलीनं आक्रमक शैलीत ९० चेंडूत शतक ठोकले.

वनडे क्रिकेटमध्ये विराटची ही 'बॅक टू बॅक' शतके पाहून प्रेक्षकांनी आनंदाने जल्लोष केला. पण, लुंगी एनिगडीनं ९३ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांनी सजलेल्या १०२ धावांच्या खेळीला अखेर पूर्णविराम दिला. मात्र त्याआधीच कोहलीनं आपल्या ५३व्या वनडे शतकासह अनेक विक्रमांना गवसणी घातली.

३०० कोटींच्या गैरव्यवहारात कारवाई; पुण्याच्या जमीन घोटाळ्यातील आरोपी शीतल तेजवानीला अटक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : येथील मुंढव्यातील ४० एकर जमीन घोटाळाप्रकरणातील आरोपी शीतल तेजवानीला पुणे (झींपश) पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणात शीतल तेजवानी मुख्य आरोपी असून तिची चौकशी देखील करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार (झरींह पुिरी) यांच्या कंपनीसाठी ही जमीन खरेदी करण्यात आली होती. त्यामध्ये, प्रकरणातील तपासाचा वेग वाढवल्यानंतर पोलिसांनी मुख्य सुत्रधार म्हणून शीतल तेजवानीची (डहळींरश्र ींशक्षुरपळ) याआधी दोन वेळा चौकशी केली होती. चौकशीत उघड झालेल्या बाबींवरून तिचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली.



पुणे जमीन घोटाळा प्रकरणातील दाखल झालेला गुन्हा रद्द करण्यासाठी शीतल तेजवानीने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुख्य न्यायाधीश चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर याबाबत सुनावणी देखील झाली. मीडिया रिपोर्ट्समुळं आपणास लक्ष्य केलं जात असल्याचा दावा तेजवानीने याचिकेत केला होता. एफआयआर मीडिया रिपोर्टवर गुन्हा दाखल केला असून मीडियात फरार घोषित करण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. दुसऱ्या जमिनीप्रकरणी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून तेजवानीची उपस्थिती आवश्यक असल्याचा युक्तिवाद देखील वकिलांनी केला होता. मुंढवा जमीन गैरव्यवहाराबद्दल आधी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत येणाऱ्या बावधन पोलीस ठाण्यात दिग्वीजय पाटील, शीतल मेजवानी आणि रविंद्र तारु यांच्या विरोधात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर, पुणे पोलिसांनी देखील यात उडी घेत नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल केला होता. आता, शीतल तेजवानीला अटक करण्यात आली आहे.

पुण्यात मुंढवा येथील १८०० कोटींची जमीन पार्थ पवारांच्या कंपनीने केवळ ३०० कोटींमध्ये घेतली तसंच यासाठी स्टँप ड्युटी म्हणून केवळ ५०० रूपये मोजल्याचा आरोप करण्यात आला होता. महत्वाचं म्हणजे पार्थ पवारांनी कोरेगाव पार्कात आयटी पार्क आणि डेटा सेंटर उभारण्याची तयारीही चालवली, एक लाखाचे भांडवल असलेल्या कंपनीला हे कसे काय शक्य होते, असा सवालही या निमित्ताने विरोधकांकडून उपस्थित केला. या व्यवहारासाठी उद्योग संचालनालयाने ४८ तासात स्टॅम्प ड्युटीही माफ केली, तर केवळ २७ दिवसांत हा व्यवहार झाला होता. हे प्रकरण माध्यमांमध्ये आल्यानंतर संबंधित व्यवहार रद्द करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा पार्थ पवार यांचे वडिल अजित पवार यांनी माध्यमांसमोर येऊन दिली होती. दरम्यान, या प्रकरणावरुन राजकीय वातावरण चांगलंच तापल्याचं दिसून आलं.

कर्मचाऱ्यांची कमतरता, तांत्रिक बिघाडामुळेमुळे प्रवाशांची गैरसोय

ग्राहकांच्या खिशावर कोणताही परिणाम होणार नाही

देशभरात तब्बल २०० हून उड्डाणे रद्द; विमानसेवेवर मोठा परिणाम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : भारतातील सर्वात मोठ्या विमान कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडिगोने आज देशभरातील २०० हून अधिक देशांतर्गत उड्डाणे रद्द केली. यामुळं दिल्लीहून मुंबईला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानसेवांवर मोठा परिणाम झाला आहे. तांत्रिक बिघाड हे कारण असल्याचे सांगितले जात आहे. काही विमानतळांवर कर्मचाऱ्यांची कमतरता देखील आढळून आली आहे. या व्यत्ययामुळे मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकसारख्या राज्यांमध्ये प्रवाशांना तासन्तास अडकून पडावे लागले.

विमान कंपनीने सांगितले की त्यांना विविध कारणांमुळे उड्डाणे रद्द करावी लागली, ज्यात क्रूची कमतरता, तांत्रिक समस्या आणि विमानतळावरील गर्दी यांचा समावेश आहे. यामुळे हजारो प्रवाशांची गैरसोय झाली. उड्डाणे रद्द केल्याबद्दल प्रवाशांनी एअरलाइनवर संताप व्यक्त केला.

चेक-इन आणि बोर्डिंग प्रक्रियेतील समस्यांमुळे, सर्व विमान कंपन्यांनी मॅन्युअल चेक-इन आणि बोर्डिंग प्रक्रिया लागू केल्या आहेत. दिल्ली विमानतळ प्राधिकरणाने सकाळी ७ वाजून ४० मिनीटांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले आहे की, प्रवाशांना गैरसोय होऊ नये यासाठी त्यांचे ऑन-ग्राउंड टीम सर्व भागधारकांशी जवळून काम करत आहेत. दरम्यान, उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील विमानतळावर प्रवाशांना सांगण्यात आले की मायक्रोसॉफ्ट विंडोजने जगभरातील मोठ्या प्रमाणात सेवा बंद पडल्याची तक्रार केली आहे, ज्यामुळे विमानतळाच्या आयटी सेवांवर परिणाम झाला आहे. तथापि, मायक्रोसॉफ्टने हे नाकारले आणि म्हटले की विंडोजमध्ये कोणत्याही तांत्रिक समस्या नाहीत. मायक्रोसॉफ्टची विंडोज सिस्टम विमानतळ आणि उड्डाण सेवांसाठी वापरली जाते. आज सकाळपासून दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर चेक-इन समस्या येत आहेत. यामुळे इंडिगो, स्पाइसजेट, अकासा एअर आणि एअर इंडिया एक्सप्रेस या चार विमान कंपन्यांच्या उड्डाणांवर परिणाम झाला आहे.

हैदराबादमध्येही प्रवाशांना समस्यांना तोंड द्यावे लागले. हैदराबादच्या राजीव गांधी विमानतळावर प्रचंड गर्दी दिसून आली. येथेही चेक-इन सिस्टममध्ये बिघाड आणि विलंब झाल्यामुळे प्रवाशांना त्यांच्या उड्डाणे चुकवाव्या लागल्या. इंडिगोच्या प्रवक्त्याने या समस्येवर प्रतिक्रिया देताना सांगितले की तांत्रिक समस्या, विमानतळावर गर्दी आणि ऑपरेशनल आवश्यकतांसह विविध कारणांमुळे त्यांच्या अनेक उड्डाणे उशिरा आणि रद्द करण्यात आली. आमचे पथक शक्य तितक्या लवकर विमानसेवा सामान्य व्हावी यासाठी परिश्रमपूर्वक काम करत आहेत.

इंडिगोने मागितली प्रवाशांची माफी

या बंद पडल्यानंतर, इंडिगोने दावा केला आहे की गेल्या दोन दिवसांपासून इंडिगोच्या विमानसेवेत झालेला व्यत्यय पुढील ४८ तासांत दूर होईल. इंडिगोने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही मान्य करतो की गेल्या दोन दिवसांत नेटवर्कवरील इंडिगोचे कामकाज लक्षणीयरीत्या विस्कळीत झाले आहे आणि झालेल्या गैरसोयीबद्दल आमच्या ग्राहकांची माफी मागतो. किरकोळ तांत्रिक बिघाड, हिवाळ्याशी संबंधित वेळापत्रकात बदल, प्रतिकूल हवामान परिस्थिती, विमान वाहतूक व्यवस्थेतील वाढलेली गर्दी आणि अद्ययावत क्रू रोस्टरिंग नियमांची अंमलबजावणी (फ्लाइट ड्युटी टाइम मर्यादा) यासह अनेक अनपेक्षित ऑपरेशनल आव्हानांचा आमच्या कामकाजावर नकारात्मक परिणाम झाला आहे, जो अनपेक्षित होता.

हा व्यत्यय कमी करण्यासाठी आणि स्थिरता पुनर्संचयित करण्यासाठी, आम्ही आमच्या वेळापत्रकात काही बदल करण्यास सुरुवात केली आहे. हे उपाय पुढील ४८ तासांसाठी लागू राहतील आणि आमचे कामकाज सामान्य करण्यात आणि नेटवर्कवरील आमचे वेळेचे पालन हळूहळू पुनर्संचयित करण्यात मदत करतील.

गेल्या दोन दिवसांपासून विमानसेवेतील व्यत्ययामुळे ग्राहकांच्या खिशावर कोणताही परिणाम होणार नाही, असे इंडिगोने आश्वासन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, ग्राहकांची गैरसोय कमी करण्यासाठी आणि शक्य तितक्या लवकर विमानसेवा स्थिर करण्यासाठी आमचे पथक दिवसरात्र काम करत आहेत. शिवाय, प्रभावित ग्राहकांना त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचण्यासाठी पर्यायी प्रवास व्यवस्था किंवा परतफेड देण्यात येत आहे.

संपादकीय....

नक्षलमुक्त अभियान

देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी एकीकडे नक्षलमुक्त भारत अभियान सुरू केले असून महाराष्ट्राच्या गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील नक्षलवाद्यांचे समर्पण करुन घेण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यश आले आहे. गेल्याच महिन्यात त्यांच्या उपस्थितीत नक्षलवाद्यांचा कम ांडो आणि मोठं बक्षीस असलेल्या नेत्याने संविधान हाती घेत नक्षल चळवळीला रामराम ठोकला. देवेंद्र फडणवीस यांनीही नक्षलमुक्त महाराष्ट्राच्या दृष्टीने पाऊल टाकलं आहे. मात्र, अद्यापही छत्तीसगडमध्ये नक्षलवादी, माओवाद्यांच्या कारवाया सुरूच असल्याचं दिसन येतं. आज सकाळपासूनच छत्तीसडच्या बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यात झालेल्या चकमकीत १२ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आलं असून ३ जवानही शहीद झाल्याची घटना घडली आहे. छत्तीसगडमध्ये सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक सुरू असून १२ नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाच्या जवानांना यश आले आहे. मात्र, या चकमकीत सुरक्षा दलांचे ३ जवान शहीद झाले आहेत. छत्तीसगडम धील बिजापूर आणि दंतेवाडा जिल्ह्यांच्या सीमारेषेवर पश्चिम बस्तर डिव्हिजन क्षेत्रात छत्तीसगड पोलिसांचे डीआरजी पथक आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक सुरू आहे. सायंकाळपर्यंत मिळालेल्या माहितीप्रमाणे १२ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात सुरक्षा दलाच्या जवानांना यश आले आहे. मात्र, डीआरजीचे तीन जवान ही या चकमकीत शहीद झाले आहे. संपूर्ण परिसराला सुरक्षा दलांनी घेराव घातले असून सर्च ऑपरेशन सुरू आहे. या घटनेनंतर सुरक्षा दलाचे जवान अधिक सतर्क झाले असून विजापूर जिल्हा मुख्यालयातून रिइनफोर्समेंट पाठवण्यात आले आहे. आतापर्यंतचे सर्च ऑपरेशनमध्ये घटनास्थळावरून नक्षलवाद्यांच्या अनेक एसएलआर आणि इंसास रायफल तसेच थ्री नॉट थ्री बंदुका सुरक्षा दलाने जप्त केल्या आहेत. दरम्यान, नक्षलवाद्यांशी लढताना शहीद झालेल्या जवानांमध्ये मोनू वडाळी, दुकारु गोंडे आणि रमेश सोडी या तिघांचा समावेश आहे. दरम्यान, गेल्याच महिन्यात आंध्र प्रदेश, ओडीसा, छत्तीसगड या तीन राज्यांच्या सीमेवर आंध्रप्रदेश पोलिसांच्या ग्रे हाउंड या विशेष पोलिस पथकाच्या कारवाईमध्ये ६ माओवाद्यांचा खात्मा झाला होता.

महाराष्ट्र 'राजभवन; झाले आता 'लोकभवन'

मुंबई : केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार म हाराष्ट्र राजभवनचे नाव आता अधिकृतपणे 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्दे श दिले आहेत. राजभवन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि लोक कल्याणासाठी समर्पित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय दिशादर्शक आहे, असे राज्यपालांनी सांगितले.

'लोकभवन' म्हणून ओळखले जाणारे राजभवन आता केवळ राज्यपालांचे निव-ासस्थान व कार्यालय न राहता, राज्यातील नागरिक, समाजा-तील विविध घटक, विद्यार्थी, संशोधक, शेतकरी आणि नागरी संघटनांशी संवाद व सहभाग यांचे एक केंद्र व्हावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

बाबांच्या चरणी नतमस्तक होऊ या

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दरवर्षी ६ डिसेंबरला देशभरातून आंबेडकरी अनुयायी मुंबईच्या चैत्यभूम ीला वंदन करण्यासाठी येतात. मुंबई महानगरी बाबासाहेबांची कर्मभूमी. जिथे जिथे बाबासाहेबांचा पदस्पर्श झाला त्या स्थळांची ओळख महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने...

ज्ञानसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुंबई ही कर्मभूमी. मुंबईच्या सार्वजनिक जीवनाशी प्रथमपा-सूनच त्यांचा संबंध होता. मुंबईप्रती बाबासाहेबांचे अतूट ऋणानुबंध आणि त्यांची संघर्षमय जीवनगाथा आजही प्रासंगिक आहे. त्यांच्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा जागोजागी आढळतात. एल्फिन्स्टन महाविद्यालय/हायस्कूल, बी.आय.टी. चाळ, राजगृह, आंबेडकर भवन, आर.एम. भट हायस्कूल, आनंद बहुजन विहार, बुद्धकालीन नालासोप-ारा, जयराज हाऊस आणि चैत्यभूमी प्रमुख आहेत. भायखळा पुलापा-सून किंग्ज सर्कल गार्डनपर्यंतचा रस्ता बाबासाहेबांच्या नावाने आजही आ-ळखला जातो. बाबासाहेब दर रविवारी या गार्डनमध्ये कुटुंबीयांसमवेत अथवा अनुयायांबरोबर सायंकाळ घालवित. या रस्त्याला त्यांचे नाव देण्याचा प्रस्ताव तत्कालीन म्यु. कॉर्पोरेटर आर.जी. खरात यांनी महानगरपालिकेत मांडला होता. कुपरेज महामार्गावर ोर्ट विभागात उभारण्यात आलेला बाबासाहेबांचा पहिला पुतळा प्रेरणादायी आहे. अनेक प्रगतिशील समाजसेवक, मित्र परिवार आणि सहकारी त्यांना याच महानगरात मिळाले.

बाबासाहेबांनी एलन्फिस्टन म हाविद्यालयातून बी.ए.ची पदवी ग्रहण केली. इथूनच काही पावलावर स्थ-ापन केलेल्या 'आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज'चा मरिन लाईन्स, चर्चगेट परिसराचा भाग येतो. तिथे मिलिटरी कॅम्प होता. आज सरकारी कार्यालये आहेत. या परिसरातील एका मोठ्या झाडाखाली बाबासाहेब बसायचे अन् मग त्यांना भेटायला वेगवेगळ्या प्रकारची मंडळी यायची. इथूनच हाकेच्या अंतरावर मेनकावा व अल्बर्ट या दोन इम ारती बाबासाहेबांनी कॉलेजसाठी खरेदी केल्या. कालांतराने इमारतीचे नाव बुद्धभवन व आनंदभवन ठेवण्यात आले.

ठाकूरद्वारपासून सीपी टँक भागाकडे वळलो की तिथे एल्फिन्स्टन हायस्कूल होते. या शाळेत बाबासाहेबांचे माध्यमि क शिक्षण झाले. हेच ते हायस्कूल जिथे ना.म. जोशी नावाचे शिक्षक होते. फळ्याच्या मागे जेवणाचे डबे ठेवलेले असत. जोशी गुरुजींनी गणित सोडवायला भीमरावांना पाचारण केल्यावर विद्यार्थ्यांनी जी हुल्लडबाजी केली तिला आटोक्यात आणले ते याच गुरुजींनी. गुरुजी पुढे कामगार नेते म्हणून प्रसिद्धीस पावले. एल्फिन्स्टन हायस्कूलनंतर अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे परळ.

परळला बी.आय.टी. (बॉम्बे इम्प्रुव्हमेंट ट्रस्ट) च्या दोन इमारती आजही आहेत. त्यातील नंबर एकच्या दुस्या माळ्यावरील खोली क्र. ५० व ५१ मध्ये भीमरावांचे बालपण गेले. या इमारतीला भीमरावांचे वडील सुभेदार रामजी सकपाळ यांनी अर्ज विनंत्या करून तत्कालीन मुंबई गव्हर्नरकडून या दोन चाळी मिळविल्या होत्या. माता रमाईंचा संसारही याच जागेत ुलला. परिसरात दामोदर हॉलमध्ये बाबासाहेबांचे कार्यालय होते. याच चाळीत कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज भीमरावांच्या भेटीकरिता आले होते. भेटीप्रसंगी म हाराजांनी भीमरावाला 'मूकनायक' वर्तम ानपत्र चालविण्यासाठी २५०० रुपयाची आर्थिक मदत केली होती. रमाईंच्या हातचा अमृततुल्य चहा घेऊन ते तृप्त झाले होते. याच चाळीत बाबासाहेबांचा लाडका पुत्र राजरत्न मृत्यू पावला. त्यानंतर बाबासाहेबांनी त्या खोलीत जाणे कमी केले. कोल्हापूरचे दत्तोबा पोवार यांना 'माझ्या आयुष्यातले मीठ संपुष्टात आले' असे लिहिले. लंडनच्या राउंड टेबल परिषदेला बाबासाहेब इथूनच गेले. केळुस्कर गुरुजींनी 'बुद्धचरित्र' भेट दिले तो हाच परिसर.

बाबासाहेबांचे सर्वात महत्त्वाचे ठिकाण म्हणजे 'राजगृह'. राजगृह हे बौद्ध संस्कृतीतले नाव. दादर येथील हिंदू कॉलनीतील ही १२९ नंबरची इम ारत. बाबासाहेबांनी या ठिकाणी दोन इमारती घेतल्या. एक इमारत विकली अन् त्यातून राजगृह आपल्या प्राणप्रिय ग्रंथासाठी इमारत बांधणारे बाबासाहेब हे एकमेव जागतिक कीर्तीचे एकमेवाद्वितीय प्रकांड पंडित ठरले. याच राजगृहात रमाईने शेवटचा श्वास घेतला. राजगृह आता श्रद्धास्थान बनले आहे. माता रमाईंच्या संसारोपयोगी वस्तू आणि बाबासाहेबांच्या पवित्र अस्थी जनतेच्या दर्शनासाठी ठेवल्या आहेत. राजगृहाप्रम ाणे आणखी एक महत्त्वाचे ठिकाण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन होय. दादर पूर्वेकडील गोकुळदास पास्ता लेनवरील हे भवन म्हणजे सर्व प्रकारच्या आंदोलनाचे ठिकाण. या इम ारतीत भारतीय बौद्ध महासभेचे केंद्रीय कार्यालय आहे. बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, वंचित बहुजन आघाडी व पीपल्स इम्प्रूव्हमेंट ट्रस्टची कार्यालये आहेत. आंबेडकरी चळवळीतल्या अनेक कार्यक्रमाचे साक्षीदार हे भवन आहे.

भिवंडी तालुक्यातील पडघा गावी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट दिली होती. पडघ्यात विहिरीवर पाणी सत्याग्रह केला होता. काशिनाथ दोंदे यांच्याकडे ते चहापाण्यासाठी उतरले होते. या घटनेचा संदर्भ 'ठाणे संघसरिता' या पुस्तकात सापडतो. प्रत्येक भीमअनुयायाला अभिमान वाटावा अशी ही सत्यघटना आहे. शहापूरला बाबासाहेबांचा सुमारे दोन दशके सहवास लाभला. शहापूर तालुक्यातील किन्हवली येथील व्यापारी चंदुलाल सरूपचंद शहा यांच्याविरुद्ध १९३०च्या इंडियन पिनल कोडच्या कायद्याखाली बेकायदा शस्त्रे आणि सेटके बाळगल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झाला होता. बाबासाहेबांनी न्यायाधीशांसमोर अवघा दोनच मि निटे युक्तिवाद केला. युक्तिवादानंतर न्यायाधीशांकडून चंदुलाल शेठ यांची आरोपातून निर्दोष सुटका करण्यात आली. ती केवळ बाबासाहेबांच्या वकिली बाण्यामुळे! वाशिंद येथील नाना मलबारी यांच्या घरी बाबासाहेब आले असता ते ज्या लाकडी खुर्चीवर बसले होते ती खुर्ची त्यांनी आजपा-वेतो जपून ठेवली आहे. आता ती खुर्ची कासने येथील बुद्ध विहाराला मलबारी यांनी दान दिली आहे. बाबासाहेब १८ ेब्रुवारी १९३३ रोजी कसारा गावी आले होते. बाबासाहेबांनी प्रचंड विराट सभेत जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर अचूक बोट ठेवले होते.

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या आर.एम. भट शाळेचे एक सुवर्णपान बाबासाहेबांच्या आठवणीने लिहिले गेले. १९४६ साली निवडणुकीच्या निमि त्ताने या शाळेत एका सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बाबासाहेब म्हणाले, ''निवडणुका खेळीमेळीच्या वातावरणात व्हाव्यात, कटुता नसावी. समाजसेवक व लोकांप्रती सहानुभूती अथवा कर्तव्यदक्षता असलेल्या व्यक्तीला संधी मिळायला हवी. निवडणूक करा पण गुण्यागोंविदाने करा. भेदभाव वाढवू नका. ज्यांना काम करण्याची आवड आहे त्यांना अवश्य संधी द्यावी या मताचा मी आहे.'' त्यानंतर २२ डिसेंबर १९४८ रोजी याच शाळेत डॉ. बाबासाहेब आणि सौ. माईसाहेब आंबेडकर या उभय पती-पत्नींचा मुंबई प्रदेश शे.का.ेच्या वतीने भव्य सत्कार समारंभ झाला होता.

परळ विभागात असलेल्या आनंद बहुजन विहारात बाबासाहेबांनी बोधगया येथून आणलेल्या बोधीवृक्षाचे रोपण स्वतः केले. वरळीतील जपानी बुद्ध विह-ारात १९५०-५१ साली भाषण करताना बाबासाहेब म्हणाले होते, ''आपल्या हालअपेष्टा थांबवण्यासाठी लोकांनी बौद्ध धम्म स्वीकारावा. आपले उर्वरित आयुष्य बौद्ध धम्माचे पुनरुज्जीवन आणि प्रसार करण्यासाठी मी व्यतीत करीन.'' त्याप्रसंगी बाबासाहेबांनी काशीनाथ जगताप सायगावकर यांना 'ह्युमन हिस्ट्री' या पुस्तकावर सही दिली होती. ती सही सायगावकर यांनी आयुष्यभर जतन केली.

बाबासाहेबांनी बुद्धांच्या पावन पदस्पर्शाने पावन झालेल्या नालासोप-ारा येथील बौद्ध स्तूपाला बुद्धपौर्णिम ेच्या दिवशी भेट दिली होती. भेटीनंतर त्यांनी मौलिक धम्मप्रवचन दिले होते. बाबासाहेब सोपा्याला पोह-ोचले तेव्हा वसईचे हरिभाऊ भोईर त्यांना पाहण्यासाठी गेले होते. दुर्देवाने बाबासाहेबांना पाहण्याची, भेटण्याची त्यांची इच्छा अपूर्णच राहिली, याची खंत त्यांना आजही आहे. वसईतील एका खून प्रकरणात चार जणांना ाशीची शिक्षा झाली होती त्यावेळी बाबासाहेब काही कागदपत्रांसाठी टांग्यातून वसईच्या न्यायालयात आले होते. त्यांना पाहण्यासाठी नागरिक आणि वकिलांनीही गर्दी केली होती अशीही आठवण भोईर यांनी सांगितली.

कुलाबा येथील जयराज हाऊसमध्ये पहिल्या माळ्यावर बाबासाहेबांचे तात्प-ुरते निवास असायचे. अन् तेही १९५४-५५च्या दरम्यान. ही इमारत आजच्या कुलाबा बस स्टेशनच्या परिसरात मुंबई सरकारने एक्वायर केली होती. तत्कालीन राज्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी ही जागा दिली होती. या हाऊसम ध्ये बाबासाहेबांचे अनेक सहकारी त्यांना भेटायला यायचे. या खोलीतून बाबासाहेबांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यात संयुक्त महाराष्ट्र समितीतील सहभागाचा निर्णय महत्त्वाचा आहे.

बाबासाहेबांच्या परिनिर्वाणानंतर त्यांच्या पार्थिव देहाला लक्षावधी अनुयायांनी अश्रूपूर्ण नयनांनी आणि दु:खित अंत:करणाने अखेरचे विनम्र अभिवादन केले तेही मुंबई शहरात. त्याच जागेवर 'चैत्यभूमी' नावाने बाबासाहेबांचे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे. 'चैत्यभूमी' हे नाव प्रख्यात बौद्ध धम्मगुरू डॉ. आनंद कौसल्यायन यांनी सुचविले होते. प्रवेशद्वारावर अशोकस्तंभ असून गर्भगृहात तथागत बुद्ध आणि बाबासाहेबांचा अर्धकृती पु-तळा विराजमान आहे. चारही बाजूला दोन ूट व्यासाचे चार स्तंभ आहेत. सिमेंट काँक्रिटच्या खांबावर पाच ूट तीन इंचीचा चौथरा आहे. चौथ्यावर सहा ूट जागा मोकळी असून स्तूपाच्या आकाराचा २२ ूट उंच व २८ ूट व्यासाचा घुमट आहे. घुमटावर छत्री असून घुमटासमोरील द्वार सांचीच्या स्तुपाप्रमाणे अलंकृत आहे. घुमटाच्या आत चौथ्यावर आठ ूट उंचीचा भरीव स्तूप असून त्यात बाबासाहेबांच्या अस्थी ठेवल्या आ-हेत. चैत्यभूमीच्या आत प्रवेश करताच अनुयायांचे हृदय भरून येते आणि डोळे पाणावतात.

या ठिकाणी मुंबईबाहेरील बाबासाहेबांच्या तीन निष्ठावंत अनुयायांचा आवर्जून उल्लेख मला करावासा वाटतो. ते अनुयायी म्हणजे निपाणी बेळगावचे बळवंतराव वर-ाळे, पानगाव लातूरचे लिंबाजी उफर् भिमदास केशव आचार्य आणि जळगा-वचे भीमशाहीर नामदेव धर्माजी खरात उफर् बापूसाहेब. बळवंतरावांनी आपला देह बाबासाहेबांच्या राजगृहात ठेवला. लिंबाजी आचार्य यांनी जीवाची पर्वा न करता बाबासाहेबांच्या अस्थी आपल्या जन्मभूमीत (पानगाव) आणल्या आणि अखेरच्या क्षणी चैत्यभूमीवर 'जयभीम' घेऊन प्राण सोडला तसेच बापूस-ाहेब खरातांनी अंत्ययात्रेत सहभागी होऊन अजरामर '६ डिसेंबर १९५६ महापरिनिर्वाण पोवाडा' रचला.

– लेखक: मिलिंद मानकर
नागपूर मो. ८०८०३३५०९६

ज्येष्ठ समाजवादी विचारवंत पन्नालाल भाऊ सुराणा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



डॉ. कार्ल मार्क्स यांचा जहाल साम्यवाद आणि राष्ट्रपिता महात्मा गांधीचा शांततावादी गांधीवाद ....या विचार वैभवातून भारत देशा-ला समाजवादी सुधारकांची महान वैचारिक परंपरा लाभली असून याच परंपरेतील समाजवादी विचारांचे ज्येष्ठ प्रवर्तक, सामाजिक जाणिवांचे प्रखर दीपस्तंभ आणि निष्ठावान कार्यकर्ते आदरणीय पत्रलाल सुराणा यांचे निधन ही समाजवादी चळवळीची अपूरणीय हानी आहे. त्यांच्या साधेपणातही अस्खलित विचारांची ताकद होती आणि कार्यातही तितकाच प्रामाणिकपणा दिसत होता. जगण्यात आदर्श अशी शालीनता होती. राष्ट्र सेवा दलाचे माजी अध्यक्ष, आपलं घर नळदुर्ग संस्थेचे आधारस्तंभ आणि आयुष्यभर समाजवादी तत्त्वांचे पालन करणारे पत्रलाल भाऊ सुराणा यांनी लोकहिताची ज्योत अखंड प्रज्वलित ठेवली. समाजातील वंचित, दुर्बल आणि कष्टकरी, पिचलेल्या घटकांबद्दल त्यांच्यात असलेला जिव्हाळा पाहून अनेकांना प्रेरणा मिळाली. आयुष्यभर संवैधानिक तत्वांची जोपासना केली, जगण्यातला साधेपणा अन् विचारातील महानता त्यांनी निरंतर जोपासली.

पत्रकारितेपासून ग्रामविकास समितीपर्यंत, साहित्यिक कार्यापासून समाजवादी चिंतनापर्यंत त्यांच्या कार्याचा व्याप विशाल होता. त्यांच्या जाण्याने समाजवादी चळवळीचा एक मजबूत आधारस्तंभ हरपल्याची जाणीव सर्वत्र व्यक्त होत आहे. त्यांचे विचार, त्यांची संवेदनशीलता आणि समाजसेवेचे अपार भान पुढील पिढ्यांना प्रेरणादायी ठरणार आहे. अशा थोर व्यक्तिमत्त्वाला आमची विनम्र आणि शतशः भावपूर्ण श्रद्धांजली.

– प्रा. (डॉ) दत्ता साखरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, धाराशिव.

-----!! स्वतःची किंमत स्वतः करा.!!-----

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

आजकाल धावपळीच्या जीवनात आपले आयुष्य किती सुंदर आहे याकडे आपले लक्षच नसते. दररोज दिसण-ारी गोष्ट म्हणून आपण बऱ्याच गोष्टी बघून न बघितल्यासारख्या करतो जे आपल्याला जवळ असते त्याची किंमत आपल्याला कधीच कळत नाही.. आणि जी वस्तूची माणसाची आपल्याला रोजच्या जीवनात सवय होते तेच जेव्हा आपल्यापासून दूर जाते, तेव्हा आपल्याला त्याची किंमत कळते.

किंमत हा आपल्या सर्वांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा शब्द आहे.आणि तो सर्वांना निश्चितच परिचयाचा आहे.दैनंदिन जी-वनात आपण रोज हा शब्द ऐकत असतो,बोलत असतो.हाच किंमत शब्द आपण रोजच्या जीवनात वेगवेगळ्या अर्थाने वापरत असतो.जस तुला माझ्या आयुष्यात आता काही किंमत नाही. हिच किंमत केली का ,शब्दाला किंमत असते,काही गोष्टी फार किंमती असतात, वगैरे वगैरे अशी वाक्य आपण अनेकदा ऐकतो,बोलतो.

कधी कधी आपण एखादयाला खुप काहीपण बोलतो त्यावेळी शब्द मनाला इतका झोंबतो की तळपायातली आग मस्तकात जायला वेळही लागत नाही.तर कधी हाच शब्द इतका सुखावतो की आपण अगदी आनंदाच्या डोहात डुबक्या मारायला लागतो. ज्याला यातील फरक समजला तो खरोखर धन्य असेल. नाहीतर आयुष्यभर त्याचा कसा व्यवहार होईल काही सांगता येत नाही. आयुष्यात आपल्याला आ-पली अर्थातच स्वतःची किंमत माहीत असणं गरजेचं आहे. आणि आपली किंमत किती हे ठरवणारे आपणच आहोत. आणि आपली किंमत ठरवणं हे आपल्याच हातात असतं.पण स्वतःच स्वतःची किंमत ठरवणं इतकही सहज सोपं नसतं.

खरचं..,आयुष्यात स्वतःची किंमत स्वतःला माहीत असणं खूप म्हणजे खूपच आवश्यक आहे.कारण स्वतःची किंमत माहीत असणारी व्यक्ती अशी विकली जात नाही. अगदी क्वचितच एखादी व्यक्ती याला अपवाद असु शकते,आपण कुणासमोर झुकायच नी कुणासम ोर नाही..किंवा झुकायच की नाही हे अशा व्यक्ती स्वतः ठरवतात.

'विहीर कोरडी पडेपर्यंत आपल्याला पाण्याची किंमत कळत नाही.' आपल्याजवळ असलेल्या गोष्टींचं महत्त्व आपल्याला विपुलतेमुळे समजत नाही. पण काही कारणाने एखादी गोष्ट दुर्मिळ झाली की मग मात्र त्या वस्तूला किती तरी मोल चढतं. पाण्याचं मोल गंगाकिनारी राहणाऱ्याला फारसं नसतंच मुळी, ते असतं वाळवंटात वस्ती करणाऱ्याला. त्याचप्रम ाणे आपले आप्तस्वकीय, मित्र आपल्यापासून दूर गेल्यास त्यांचं मोल आपल्याला समजू लागतं.

'कोणत्याही गोष्टीची किंमत, दिली जाते म्हणून तिला किंमत असते.'

सहजगत्या सापडणाऱ्या गोष्टीला काहीही मूल्य नसते. पण खूप परिश्रम घेऊन, खूप कौशल्य लावून, खूप त्याग करून एखादी गोष्ट तयार केली तर मात्र तिला अधिकाधिक किंमत प्राप्त होते. जसं माणसानं अतिशय कष्टानं जोपासलेल्या फळबागेतील फळाला खूप किंमत येते. कारण त्यासाठी त्यांना कष्टाची, काळजीची किंमत दिलेली असते.कष्ट ही अशी प्रेरक शक्ती आहे, जी माणसाची क्षमता तपासते आणि त्याला विकासाच्या मार्गावर नेते.

आयुष्यात प्रत्येक व्यक्तिला किंमत देता आली पाहिजे, कारण या जगात उद्या काय होईल ते कोणालाच माहित नसते एकत्र येणे ही सुरवात,एकामेकांसोबत राहणे ही प्रगति आणि एकाम ेकांसोबत काम करणे म्हणजे यश.

दुसऱ्यांच्या परिस्तिथीची जाणीव आपण स्वतः त्या परिस्थितीतून गेल्याशिवाय होत नाही आणि तोपर्यंत आपल्याकडे उपलब्ध असलेल्या सोयींची किंमतही कळत नाही.

आपल्याला देवाने दोन हात, पाय दिले आहेत याचे तुम्हाला कधी नवल वाटते का? नक्कीच नाही पण त्या हाताची किंमत काय असते ते एका अपंग झालेल्या व्यक्तीला विच-ारा.. तो तुम्हाला त्याचे महत्व नक्की सांगू शकेल. किंवा असे दृश्य डोळ्यासमोर आणा कि उद्या तुम्हाला दोन्ही हात नाही हे तेव्हा जेवताना, लिखाणाची आठवण आली कि, शी-शु ला गेले कि, कधी काही खेळावेसे वाटले कि, कधी समोर काही फुल दिसली कि याची काय किंमत असते ते जाणवेल तुम्ह-ाला. तसेच पायाचे पण आहे. आपल्या शरीरातील प्रत्येक भाग महत्वाचा आहे आणि प्रत्येक भागाचे महत्व आपल्याला तो भाग दुखायला लागला , किंवा त्याला काही इजा झाल्यावरच जाणवते.

आपण सहज बाहेर फिरून आलो आणि कोणी आपल्याला विचारले, कुठे जाऊन आलास? काय पाहिलेस? तर आपण बोलू काही खास नाही, पण तेच तुम्ही एका अश्या व्यक्तीला विचारले जो काही दिवानपुर्वी आंधळा होता आणि नुकतेच त्याला दिसायला लागले तर तो सांगेल कि मी बरीच सुंदर सुंदर झाड पहिले, रंगीबेरंगी फुले, सगळ्यांचे चेहऱ्यावरचे भावना, आणि अजून बरेच काही सांगू शकेल, जे कदाचित मी नाही सांगू शकत. आयुष्यात आपण रोज दिसणाऱ्या गोष्टी म्हणून बऱ्याच गोष्टी डोळ्यासमोर असून लक्ष देत नाही. प्रत्येक गोष्ट बारकाईने लक्ष देऊन, सर्व गोष्टींचा आनंद लुटा. एवढी वर्ष शरीराच्या प्रत्येक अवयवाने साथ दिली म्हणून आपण जगण्याचा आनंद लुटू शकलो, त्या शरीराचे आभार माना आणि हात, पाय नीट आहेत तो पर्यंत सगळीकडे फिरून, सगळ्या गोष्टींचा अनुभव घेऊन आनंद लुटण्याचा प्रयत्न करा.

आपले जीवन जास्त दिवसाचे नाही म्हणून एखादी गोष्ट म्हातारपणीच करावी म्हणून ठेवू नका, कोणाला माहित म्ह-ातारपण बघण्यासाठी आपण जगू पण कि नाही ते?*

तुम्हाला जर एके दिवशी कळाले कि आता फक्त ८ दिवस तुम्ही जगणार आहात, तर ते ८ दिवस तुम्ह-ाला कसे जगायला आवडतील? तसाच रोजचा दिवस जगायला शिका. रोज जमेल तेवढे जास्तीत जास्त आनंदी राहा. आजकाल आपण लहान-लहान गोष्टीना जास्त महत्व देऊन स्वतःला दुःखाच्या खाईत अडकवून घेतो.

माणूस किती किंमतीचे कपडे वापरतो यावरून त्याची किंमत होत नसते.

तो इतरांची किती किंमत करतो यावरुन त्याची किंमत ठरते.

जिवाचा आटापिटा केला तरी कातडीचे जोडे जरी केले तरी कितीही कसंही काहीही केलं तरी झिजणा-या माणसाची किंमत नाही होत.

कोण म्हणतं अश्रूंना किंमत नसते.

अश्रूंना बहुमूल्य अशी किंमत असते.

कारण अश्रूचा एक थेंब जरी ओघळला तरी मनाचा खूप सारा भार हलका होतो जवळ असताना किंमत नसते दूर झाले की लगेच कळते.

अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करायला शिका, आणि आनंदी राहून या जीवनाची मज्जा घ्या. आयुष्य खरच खूप सुंदर आहे, ते बघायला शिका.

लेखन : मा. प्रा. श्री काशिनाथ आटपाडकर

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

नळदुर्ग नगरपरिषदेचा नगराध्यक्ष कोण ? भाऊ, आप्पा, अण्णा की भाई

उत्सुकता शिगेला; निकाल लांबणीवर गेल्याने उमेदवारामध्ये धाकधुक वाढीस,

नगराध्यक्ष व नगरसेवकाचा फैसला ईव्हीएम मशीनमध्ये सीलबंद, ७३ टक्के झाले मतदान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस.के.गायकवाड : धाराशिव जिल्ह्यात सर्वांचे लक्ष केंद्रित केलेल्या तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी कोण विराजमान होणार भाऊ,आप्पा, अण्णा, की भाई याकडे सर्वांचे लक्ष लागले असून नराध्यक्ष पदाचा व नगरसेवक पदाचा फैसला ईव्हीएम मशीन मध्ये शिल बंद झाला असून ७३ टक्के म तदारांनी बजावला मतदानाचा हक्क.दि.३ डिसेंबरचा निकाल लांबणीवर गेल्याने उमेदवारामध्ये धाकधुक वाढली असून जनतेची उत्सुकता शिगेला पोहंचली असून आता लक्ष २१ डिसेंबरकडे लागले आहे.

नळदुर्ग नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २२५ च्या निवडणुकीत १ नगराध्यक्ष व २ नगर सेवक निवडीसाठी दि.२ डिसेंबर २२५ रोजी एकून १० प्रभागातून मतदान घेण्यात आले. सर्व प्रभागातून ७३ % मतदान झाले असून लागलीच दि.३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार होती परंतू ऐनवेळी निवनुक आयोगाने निकालाची तारीख लांबवून २१ डिसेंबर केल्यामुळे दि.३ डिसेंबरच्या निकाल्याच्या उत्सुकतेवर विरजन पडलेअसून निकालाची उत्सुकता वाढीस लागली असून उमेदवारा मध्ये मात्र धाकधुक निर्माण झाली आहे.

दि. २१ डिसेंबरला नगराध्यक्ष पदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार न.प. च्या सत्तेची सूत्रे कोणत्या पक्षाच्या हातात राहणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

नळदुर्ग नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व शिवसेना (उबाठा) महाविकास आघाडी कडून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उद्योजक अशोक भाऊ जगदाळे, राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाकडून संजय अण्णा बताले तर भाजपा शिव सेना (एकनाथ शिंदे) महायुती कडून भाजपाचे बसवराज आप्पा धरणे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून मेहबूबभाई शेख तर एम आय एम कडून माजी नगराध्यक्ष शहबाज काजी व अपक्ष उमेदवार निवडणूक रिंगणात असून अरोप प्रत्यारोप करत एका पेक्षा एक वरचड सभा घेवून निवडनुकीचे वातावरण तापवले होते.मतदाराना आपल्याकडे आकर्षीत करण्यासाठी अनेक प्रलोभने दाखविण्यात आली होती. प्रत्येक पक्ष नळदुर्ग शहराचा आम्हीच विकास करणार असा दावा करत प्रचारामध्ये रंगत आणली होती. डिजिटल मीडियाचा सुद्धा प्रचारामध्ये मोठ्या प्रमाणात वापर झाला होता. एकूणच निवडणुकीचे वातावरण ताउन सुलाखून निघाले होते.अशा परिस्थितीमध्ये दि.२ डिसेंबर रोजी उत्स्फूर्तपणे मतदारांनी मतदान ही केले दि.३ डिसेंबरला निकाल लागणार होता. सगळ्यांनी गुलाल

खरेदीची तयारी केली होती.पण ऐन वेळेला निकालाची तारीख लांबल्याने सगळ्यांच्याच उत्सुकतेवर विरजण पडले आणि सर्व मतदार नागरिक राजकीय मान्यवरांनाआता तर्कवितर्क काढत दि.२१ डिसेंबर २२५ ची वाट बघत बसण्याची वेळ आली आहे. शेवटी नळदुर्ग नगर परिषदेच्या अध्यक्ष पदी आप्पा भाऊ अण्णा की भाई हे दि २१ डिसेंबर रोजीच ठरणार आहे.

दुधनी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत ७०.९७ टक्के मतदान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

दुधनी/प्रतिनिधी : दुधनी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत एकूण ७०. ९७ टक्के इतके मतदान झाले आहे. दुधनी येथील १० हजार ९०५ मतदारांपैकी ७ हजार ७३९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला.

दुधनी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी दिनांक २ डिसेंबर रोजी मतदान झाले. दुधनी थेट नगराध्यक्ष पदासह २० नगरसेवक पदांसाठी मतदान घेण्यात आले. दुधनीत १६ मतदान केंद्रांवर एकूण दहा हजार ९०५ मतदारांपैकी ७ हजार ७३९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावीला. दुधनी नगर परिषद निवडणुकीत ५ हजार ५५४ पुरुष मतदारांपैकी ३ हजार ९८० तर ५ हजार ३५० महिला मतदारांपैकी ३ हजार ७५८ मतदाराने मतदानाचा हक्क बजाविला. दुधनी नगर परिषद निवडणुकीत थेट नगराध्यक्ष पदासाठी पाच उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. तर नगरसेवक पदाच्या वीस जागांसाठी ५३ उमेदवार उभे होते. या सर्वच उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले. दुधनी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक निर्णय अधिकारी विनायक मगर यांनी काम पाहिले.दुधनी नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दुधनी येथे पोलिसांचा चूक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

१० डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघाचा नागपुर अधिवेशनावर भव्य मोर्चा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : महाराष्ट्र राज्यातील जवळपास ३५, ००० पोलीस पाटील विविध मागण्यासाठी व विविध विषयावर केलेल्या घोषणांचे सरकार ला स्मरण व्हावे म्हणून नागपूर अधिवेशनात दिनांक १०/१२/२०२५ बुधवार रोजी राज्यातील महाराष्ट्र राज्य गाव पोलीस पाटील संघाच्या वतीने भव्य दिव्य मोर्चाचे आयोजन केलेले आहे.

या मोर्चाचे आयोजन महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघांचे राज्याचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब शिंदे पाटील यांच्या नेतृत्वाखाली होणार असून महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातून जवळपास १५ हजार पोलीस पाटील उपस्थित राहण्याचा अंदाज राज्याचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील यांनी माहिती दिली आहे. सर्व जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात पोलीस पाटील उपस्थित राहणार आहेत. पुणे जिल्ह्यातून सर्वात जास्त पोलीस पाटील उपस्थित राहतील असा अंदाज पुणे जिल्हा अध्यक्ष अविनाश शेंडगे पाटील, राज्य सदस्य विनायक गायकवाड पाटील, जिल्हा उपाध्यक्ष श्री. कैलास जाधव पाटील, पुरंदर तालुका कार्याध्यक्ष श्री.अमोल लोळे पाटील यांनी व्यक्त केला.

महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष सौ सारिका झेंडे पाटील पुणे जिल्ह्यातून सर्वात जास्त पोलीस पाटील बंधू भगिनी उपस्थित राहतील अशी माहिती आमच्या प्रतिनिधीला दिली.

सदर आयोजित केलेला मोर्चा सर्व पोलीस पाटलांना एकत्रित करून राज्यातील पोलीस पाटलांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याच्या उद्देशाने केलेला असून त्यामध्ये प्रमुख मागणी १)पोलीस पाटलांचे वय ६० वरून ६५ करण्यात यावे २) रिक्त ठिकाणी नवीन पोलीस पाटलांची भरती व्हावी ३)नूतनीकरण कायमचे बंद व्हावे ४) प्रवास भत्ता मध्ये वाढ व्हावी. अशा विविध मागण्या संदर्भात पोलीस पाटलांचा नागपूर अधिवेशनावर मोर्चा काढण्यात आलेला आहे. तरी या माध्यमातून पुरंदर तालुक्यातून व पुणे जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात पोलीस पाटील उपस्थित राहणार असल्याची माहिती पुणे जिल्हा कार्याध्यक्ष उमेश तळेकर पाटील यांनी पत्रकारांना दिली आहे.

मतदानदिवशी सुद्धा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कळंब तालुक्यात अवैध दारूवर कारवाई

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे,

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक २०२५च्या अनुषंगाने निवडणुक आदर्श आचार सहिंतेच्या काळात दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक जि. धाराशिव विभागाने विभागाचे मा. श्री. डॉ. राजेश देशमुख, आयुक्त, मा.श्री. प्रसाद सुर्वे सहआयुक्त, (दक्षता व अंमलबजावणी) राज्य उत्पादन शुल्क,श्रीमती संगीता दरेकर, विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, छ. संभाजीनगर विभाग छ. संभाजीनगर, श्री.हर्षवर्धन शिंदे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जि. धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली मौजे. माळकरंजा, मौजे, वाठवडा ता.कळंब येथे हातभट्टी निर्मिती रसायन जप्त करून ०३ गुन्हे नोंद केले करून ०३ आरोपी नामे १) बादल उमराव चव्हाण रा.माळकरंजा ता.कळंब २) खय्युम शब्बीर बेग रा.वाठवडा ३) सोनाबाई शिवाजी काळे रा.वाठवडा ता.कळंब तसेच वरूडा शिवार परिसर ता.जि.धाराशिव येथे ०१ गुन्हा नोंद करून ०१ आरोपी नामे १)रमेश दादाराव गाढवे रा.वरुडा ता.जि.धाराशिव सदर कारवाई एकुण रु १,०३,९६०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर ची कारवाई श्री.हर्षवर्धन शिंदे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जि.धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली बाळकृष्ण ढोकरे, प्र.निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, जि. धाराशिव, सोबत आर. के बागवान दु.नि, ए.ए. गवंडी, टी.एच. नेर्लेकर, ए.सी.खराडे, ए.डी. गटकांबळे, संतोष कलमले, महिला जवान ऐश्वर्या इंगळे, यांनी सदरची कारवाई यशस्वी केली असुन पुढील तपास बाळकृष्ण ढोकरे, प्र.निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक, जि.धाराशिव हे करीत आहेत. जिल्ह्यातील अवैध मद्य निर्मीती वाहतुक व विक्रीबाबतची माहिती या कार्यालयास कळविणे बाबत अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जि. धाराशिव यांनी जनतेला आवाहन केले आहे.

सोलापुरातील आयएमसीचा प्रमुख सीएनजी पंप अचानक बंद; वाहनधारकांची गैरसोय

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापुरातील एमआयडीसी चिंचोली या ठिकाणी आय एन सी लिमिटेडच्या माध्यमातून चालवला जाणारा शहरातील प्रमुख सीएनजी पंप आज मंगळवारपासून बंद असल्याचे दिसून आले आहे. कंपनीने कालच नोटीस फलक लावून २ डिसेंबरपासून पंप बंद राहणार असल्याची माहिती दिली होती. यामुळे वाहनधारकांची मोठी तारांबळ उडाली आहे.

पंप बंद असल्याने उछक्र वाहनधारक मोठ्या गैरसोयीला सामोरे जात आहेत. सीएनजी भरण्यासाठी रांगेत होणारी अरेरावी, वाढती कटकट आणि स्थानिक नागरिकांच्या तक्रारींनंतर हा निर्णय घेतल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. याच कंपनीच्या स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंपावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पंप बंद ठेवल्याचेही समजते. याबाबत कंपनीच्या प्लांट मॅनेजर यांनी आजपासून सीएनजी पंप बंद असल्याचे सांगितलं. याबाबत आणखी माहिती उपलब्ध थोड्याच वेळात देण्यात येणार असल्याचेही त्यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांचा मतदार यादी नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे विभागातील पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या नव्याने मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमांतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारुप मतदार यादीनुसार पुणे विभागात २ लाख ७२ हजार ६१ पदवीधरांची तर ४४ हजार २३३ मतदारांची नोंदणी झाली आहे.

या २०२५ च्या कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार यादीनुसार पदवीधर मतदार संघासाठी पुणे जिल्ह्यात ५४ हजार ८१० मतदार नोंदणी, सातारा-३५ हजार ८७९, सोलापूर- ३० हजार ४७२, कोल्हापूर- ८० हजार १८०, सांगली- ७० हजार ७२० अशी एकूण २ लाख ७२ हजार ६१ इतकी

प्रारुप मतदार यादीनुसार दोन लाख ७२ हजार पदवीधरांची व ४४ हजार शिक्षकांची नावनोंदणी

नोंदणी झाली आहे. तर शिक्षक मतदार संघासाठी पुणे- ९ हजार ७७८, सातारा- ८ हजार ४९२, सोलापूर- ११ हजार १९८, कोल्हापूर ८ हजार ६३१ व सांगली- ६ हजार १३४ अशी एकूण ४४ हजार २३३ मतदारांची नोंदणी झाली आहे.

२०२० मध्ये पदवीधर मतदार संघासाठी ४ लाख २० हजार ८९६ इतकी तर शिक्षक मतदारांची ७२ हजार १९० इतकी नोंदणी होती. गेल्या निवडणुकीपेक्षा यावर्षी आतापर्यंत कमी मतदार नोंदणी झाली आहे. त्यामुळे राजकीय पक्षांनी मतदार नोंदणीची प्रसिद्धी व जागृती करुन जास्तीत जास्त पात्र मतदारांना नोंदणीसाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदार संघाचे मतदार नोंदणी अधिकारी डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले आहे.

मतदार याद्या नव्याने तयार करण्याचा कार्यक्रम:

या कार्यक्रमांतर्गत १८ डिसेंबर २०२५ पर्यंत मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या पदनिर्देशित अधिकारी किंवा संबंधित विधानसभा मतदार संघाचे सहायक मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडे दावे व हरकती दाखल करता येतील. नवीन नाव नोंदणीचा दावा दाखल करण्यासाठी पदवीधरांना नमुना क्रमांक १८ व शिक्षकांना नमुना क्रमांक १९ द्वारे याच कालावधीत दावा दाखल करता येईल. प्रारुप मतदार यादीतील नावांबाबत आक्षेप असल्यास नमुना क्रमांक ७ व यादीतील नोंदीमध्ये दुरुस्तीसाठी नमुना क्रमांक ८ दाखल करता येईल.

दावे व हरकतींचा कालावधी संपल्यानंतर ५ जानेवारी २०२६ रोजी दावे व हरकती निकाली काढून पुरवणी यादी तयार करणे व छपाईची कार्यवाही करण्यात येईल. पदवीधर व शिक्षक मतदार संघाच्या यादीची अंतिम प्रसिद्धी १२ जानेवारी २०२६ रोजी केली जाणार आहे.

रामेगाव येथील गावशिवार ग्रो प्रोड्युसर कंपनीचा सोयाबिन खरेदी शुभारंभ सुरुवात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील रामेगाव येथील गाव शिवार ग्रो प्रोडूसर कंपनी चा सोयाबिन खरेदी शुभारंभ करण्यात आला.

रामेगाव येथील गाव शिवार ग्रो प्रोड्युसर कंपणी चे सर्वे सर्वा चेअरमन शरद पाटील यांच्या संकल्पणेतुन शेतकरी हित जोपासण्यासाठी व सर्वसामान्य शेतकर्यांना सरकारी हमिभावात आपला शेतीमाल विक्री करता याव यासाठी गेल्या अनेक वर्षापासुन रामेगाव येथे गावशिवार ग्रो कंपणी च्या माध्यमातुन सोयाबिन खरेदी केंद्र चालु असुन आज शेतकर्याचा शेतीमाल सोयाबिन शासकीय हमिभाव खरेदी चालु असुन आज शासकीय हमिभावाने शेतीमाल खरेदी सुरु करण्यात आली असुन, जास्तीत जास्त शेतकर्यांनी आपला शैतीमाल शासकीय हमिभावाने विक्रीसाठी गाव शिवार ग्रो प्रोड्युसरला घेउन यावा सोबतच आपल्या शेतीमालाचे ऑनलाईन करण्यासाठी शेतकर्यांनी आपले आधार कार्ड, बँक पासबुक, सातबारा सह कागदपत्रासह गाव शिवार खरेदी केंद्रावर येउन आपल्या शेतीमाल विक्रीसाठी ऑनलाईन करावे अस आवाहण चेअरमन शरद पाटील यांनी केल आहे .शुभारंभ प्रसंगी कंपनीचे ज्येष्ठ संचालक अजय साळुंके यांच्या शुभहस्ते पुजन करत श्रीफळ फोडण्यात आले , यावेळी खरोसा सोसायटीचे चेअरमन अमोलजी सांडूर. मा, सरपंच दीपक मुसांडे, लिंबराज होगले, अजय पाटील, रुपेश होगले, सह संचालक जगदीश शेळके, दत्ता ढाले, प्रदीप पाटील सुदर्शन शेळके असलम शेख नवनाथ भारती, भागवत वाडकर, सह आदी ग्रामस्थ शेतकरी उपस्थित होते.

मतदान प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि निवडणूक आयोगाच्या नियमांनुसारच !

मतदान करण्याच्या कोणत्याही ईव्हीएम मशीनवरील चिन्हावर पेनने खुणा नाहीत : निवडणूक निर्णय अधिकारी सिमा होळकर

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर, दि. ३ : पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान 'ईव्हीएम (EVM) मशीनवरील चिन्हावर पेनाने खुना केल्याच्या या आशयाचे वृत्त काही प्रसारमाध्यमांतून प्रसारित होत आहे. यावर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अधिकृत खुलासा केला असून, मतदान करण्यापुर्वी काही लोक सही ऐवजी अंगठा करतात. त्या अंगठ्याला लागलेली शाई मतदान यंत्राला लागल्याचे दिसून येत होती. यंत्रावरील शाई तात्काळ पुसण्यात आली. मतदान करण्याच्या कोणत्याही ईव्हीएम मशीनवरील चिन्हावर पेनने खुणा नाहीत .मतदान प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि निवडणूक आयोगाच्या नियमांनुसारच करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी दिली.

तसेच दि २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सर्व उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ईव्हीएम मशीनचे 'सेटिंग व सिलिंग' करण्यात आले होते. . त्याबरोबर राखीव मशीन्स देखील २८ नोव्हेंबरलाच तयार करण्यात आल्या होत्या.

निवडणूक आयोगाकडील मार्गदर्शक सूचना व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रियेचे कामकाज पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने सुरू आहे. प्रभाग ७ मधील जागाब चा निवडणूक कार्यक्रम ४ डिसेंबर ला सुरु होत असून २० तारखेला मतदान होणार असून, पंढरपूर नगरपरिषदेसाठी निडणूक लढवलेल्या सर्व उमेदवारांची व नगराध्यक्ष पदाच्या .उमेदवारांची एकत्रित मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे होणार आहे

नागरिकांनी व उमेदवारांनी कोणत्याही गैरसमजाला बळी पडू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे

दिव्यांगांच्या पदसुनिश्चितीसाठी तज्ज्ञ समितीची पुनर्रचना : सचिव तुकाराम मुंढे

प्रक्रियेसाठी एकसमान कार्यपद्धती निश्चित

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : दिव्यांग व्यक्तींना शासकीय, निमशासकीय सेवेत नियुक्ती आणि पदोन्नतीमध्ये चार टक्के आरक्षणाचा कायदेशीर हक्क प्रभावीपणे मिळावा, यासाठी पदसुनिश्चिती प्रक्रियेसाठी एकसमान कार्यपद्धती (एसओपी) तयार केली आहे. पदसुनिश्चिती प्रक्रिया अधिक शास्त्रीय आणि पारदर्शक करण्याच्या हेतूने तज्ज्ञ समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो दिव्यांग उमेदवारांसाठी रोजगार, सर्व स्तरांवर समान संधी सुनिश्चित होण्यास मदत होणार असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पदसुनिश्चिती प्रक्रियेसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. शासकीय, निमशासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच स्वायत्त संस्था आणि महामंडळांमधील मंजूर पदांचा सखोल आढावा घेऊन दिव्यांग व्यक्ती कोणत्या पदांवर कार्यक्षमतेने काम करू शकतील, हे ओळखणे आता बंधनकारक राहणार आहे. प्रत्येक मंत्रालयीन विभागात यासाठी तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती स्थापन करेल.

प्रत्येक मंत्रालयीन विभागाच्या या समितीत अंध-अल्पदृष्टी, श्रवणदोष, अस्थिव्यंगता, स्वमग्नता, विशिष्ट शिक्षण अक्षमता व मानसिक आजार अशा विविध प्रवर्गांतील किमान एका तज्ज्ञाचा समावेश असेल. समितीचे अध्यक्ष त्या विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव राहतील.

समिती सहाय्यक तंत्रज्ञानातील विकास, जागतिक रोजगार मानके आणि पदांच्या जबाबदारीचे स्वरूप लक्षात घेऊन विभागातील पदांची योग्यतापरीक्षण करण्यासोबतच पदसाखळीतील सर्व स्तरांचा विचार करून पदसुनिश्चिती प्रस्ताव सादर करणार आहे. दिव्यांगांसाठी सुयोग्य नसलेल्या पदांना सूट दिली जात असल्यास, ती जास्तीत जास्त तीन वर्षेच वैध राहणार असून त्याचे पुनरावलोकन अनिवार्य असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, प्रत्येक विभागाने दरवर्षी १ जानेवारी रोजी पदसुनिश्चितीची अद्ययावत स्थिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आणि तिची प्रत आयुक्त, दिव्यांग कल्याण तसेच दिव्यांग कल्याण विभागास सादर करणे बंधनकारक राहील. तसेच सरळसेवा भरती व पदोन्नती करताना संबंधित भरती यंत्रणेकडे तीन वर्षात एकदा पदसुनिश्चितीचा आढावा घेतल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पुण्यातील मालधक्का चौकातील जागेबाबत प्रस्ताव सादर करावा : उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे



मुंबई : पुणे स्टेशनलगत मालधक्का चौकातील महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) ताब्यातील जागा शासनाकडे हस्तांतरित करून ती जनहितासाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.

विधानभवन येथे झालेल्या बैठकीस अपर मुख्य सचिव (नगरविकास) असीम गुप्ता, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरजकुमार, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, वैद्यकीय शिक्षण संचालक डॉ. अजय चंदनवाले, महाव्यवस्थापक श्रीमंत पाटोळे, तसेच पुणे जिल्हाधिकारी कार्यालय व पुणे महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे शैलेंद्र मोरे, दीपक गायकवाड, निखिल दुर्गाई, जीवन घोंगडे, आनंद घेडे, नीता अडसुळे, स्वाती गायकवाड, अर्चना केदारी, संदीप शिंदे, मिलिंद अहिरे, सुधीर कुरूमकर उपस्थित होते.

उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे म्हणाल्या, संबंधित जागा सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात यावा. यासंदर्भातील सर्व मुद्यांची दखल घेवून आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देशही उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी दिले.

मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने दिव्यांग बांधवांना अंत्योदय योजनेत धान्य उपलब्ध करण्याची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय योजनेत (शिधापत्रिका) समाविष्ट करुन त्यांना धान्य उपलब्ध करण्याची मागणी मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने दि.३ डिसेंबर २०२५ रोजी जागतिक दिव्यांग दिनाच्या निमित्ताने निवेदन देऊन करण्यात आली आहे. यावेळी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, दि.३ डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन असून तो जगभरात साजरा केला जातो. सन १९९२ पासून संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने हा दिन जाहीर केला असुन दिव्यांग/अपंग व्यक्तीबाबत जाणीव व जनजागृती व्हावी या उद्देशाने हा दिन साजरा केला जातो.

दिव्यांग दिनाच्या अनुषंगाने मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने दिव्यांग बांधवांच्या विविध मागण्याचे निवेदन तहसिल कार्यालय पुरवाठा विभाग नायब तहसीलदार श्रीमती माळवे यांना देण्यात आले. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ नुसार जे कळंब तालुक्यातील दिव्यांग बांधव आहेत त्या बांधवांची आपल्या कार्यालयाच्या वतीने शोध मोहीम राबवून अशा दिव्यांग बांधवांना नविन शिधापत्रिका किंवा ज्या कुटुंबातील शिधापत्रिकेत त्यांचा समावेश आहे. अशा शिधापत्रिकेत अंत्योदय योजनेत त्यांचा समावेश करण्यात यावा व त्यांच्या हक्काचे धान्य उपलब्ध करुन द्यावे, तसेच संजय गांधी निराधार योजनेमधून त्यांना दरमहा २५००/- (दोन हजार पाचशे) रुपये पेन्शन मिळत आहे.

परंतु सद्यस्थितीत महागाई वाढल्यामुळे व त्यांना शारिरीक कष्ट करता येत नसल्यामुळे त्यांना दरमहा ६०००/- (सहा हजार) रुपये करण्यात यावी, तसेच कळंब तालुक्यातील ग्राम पंचायती मार्फत ५ % टक्के निधी देण्यात येतो तो तात्काळ देण्यात यावा, व या निधी मध्ये वाढ करुन तो १०% टक्के निधी देण्यात यावा, तसेच कळंब तालुक्यातील दिव्यांग बांधवांचा दारीद्रय रेषेचा सर्वे करुन त्यांचा दारिद्रय रेषेखाली समावेश करण्यात यावा. आदि मागण्या निवदेनाद्वारे करण्यात आल्या आहेत. सदरील मागण्यांवर योग्य ती कार्यवाही करावी मागणी मान्य न केल्यास लोकशाही मार्गाने संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे. या निवेदनावर मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भाऊ पाटुळे, लोक जनशक्ती पार्टी चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड, प्रहार दिव्यांग संघटनेचे संपर्क प्रमुख मारुती वाघमारे, लोकजनशक्ती पार्टी चे तालुकाध्यक्ष भारत कदम, भिवाजी ताकपिरे, पत्रकार प्रविण कसबे यांच्या स्वाक्षरी आहेत.

संविधान दिन व 'आम्ही भारतीय लोक' संघटनेचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

शहापूर प्रतिनिधी/दिनेश घनघाव : दिनांक ३० नोव्हेंबर रोजी काजळविहीर येथे संविधान दिन तसेच 'आम्ही भारतीय लोक' संघटनेच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीमाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन जनार्दन निचिते यांनी प्रभावीपणे केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात भरत निचिते यांनी संघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमी, उद्दिष्टे आणि वर्षभर राबविण्यात आलेल्या उपक्रमांचा संक्षिप्त आढावा मांडला. प्रमुख वक्ते राजेश मोगरे यांच्या अभ्यासपूर्ण आणि प्रभावी व्याख्यानाने सभेला बौद्धिक उंची प्राप्त झाली. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या संविधानातील मूलभूत तत्त्वांची त्यांनी अतिशय सुलभ, परंतु सूत्रबद्ध अशी मांडणी केली. उद्देशिकेतील प्रत्येक शब्दामागील अर्थ त्यांनी तर्कशुद्ध उदाहरणांसह पटवून दिला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. संजय निचिते यांनी संविधानामुळे भारत एकसंघ राष्ट्र म्हणून उभा राहिल्याचे अधोरेखित केले. स्वातंत्र्यापूर्वी मनुस्मृतीच्या आधारे चालणाऱ्या व्यवस्थेचा उल्लेख करून, भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषत: मागास घटकांच्या उन्नतीसाठी करण्यात आलेल्या आरक्षणाच्या तरतुदीचे महत्त्व त्यांनी प्रभावीपणे स्पष्ट केले.

यावेळी गावातील नागरिकांनीही आपली मनोगते व्यक्त केली. श्किसन निचिते यांनी संविधानाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व अधोरेखित केले, तर धीरज निचिते यांनी समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी संविधान साक्षरता अत्यावश्यक असल्याचे मांडले.

कार्यक्रमाला गावातील अनेक मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. मालू गणू निचिते, शजयराम उंद्रु निचिते, विठ्ठल जानू निचिते, मारुती निचिते, भाऊ निचिते, वसंत निचिते, रमेश पितांबरे, जयराम महादू निचिते, सचिन निचिते, अजय निचिते, श्री. महादू निचिते, गजानन घोडविंदे, शरद घोडविंदे, प्रसाद निचिते, प्रवीण भोईर यांनी उपस्थिती दर्शविली. आसनगाव येथून चंद्रकांत चंदे, श्रीकांत चौधरी व निखील चंदे उपस्थित होते. वालशेत येथून विष्णू निचिते, रमेश कांतीलाल निचिते, दिनेश घनघाव आवर्जून उपस्थित राहिले. यावेळी काजळविहीर गावातील शाळकरी विद्यार्थ्यांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती.

संपूर्ण कार्यक्रमाचे संयत, नेटक्या आणि प्रभावी शब्दांत सूत्रसंचालन अनिल निचिते यांनी केले. तर आभार प्रदर्शन रमेश निचिते यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आम्ही भारतीय लोक संघटनेचे अध्यक्ष अनिल निचिते, उपाध्यक्ष रमेश निचिते, सचिव भरत निचिते, कार्याध्यक्ष डॉ. संजय निचिते, सहसचिव धीरज निचिते, खजिनदार शजनार्दन निचिते, संघटक शप्रकाश मारुती निचिते, रवींद्र दिनकर, प्रकाश मालू निचिते, अरुण निचिते, चंद्रकांत निचिते, प्रवीण निचिते, शरद निचिते, अरुण तुकाराम निचिते, रवींद्र निचिते यांनी विशेष मेहनत घेतली.

संविधान मूल्यांवर आधारित अशा या उपक्रमाने काजळविहीर गावात लोकशाही, समानता आणि बंधुतेचा संदेश दृढपणे रुजविला.

झाडीच्या कवितांनी रंगले कविसंमेलन : विदर्भातील कवींची हजेरी

ऐका हो, महती... बाप माझा आमरस, माय त्याची रसवंती...!

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अर्जुनीमोरगाव : 'ऐका हो मायबापाची महती, बाप माझा आमरस, माय त्याची रसवंती....' कवी मुन्नाभाई नंदागवळी यांच्या कवितेतील ओळींनी अख्खे सभागृह मंत्रमुग्ध झाले. कवितेतील ओळींनी शेतकरी व काबाडकष्ट करणारे कुटुंबाची महती त्यांनी आपल्या कवितेच्या शब्दातून मांडले आहे. सलग दोन दिवस याच कवितेच्या ओळी संमेलनाच्या प्रत्येक रसिकांच्या ओठांवर याच कवितेच्या ओळी बहरत होत्या. या कवितेने कविसंमेलनाला रंग आला व कविसंमेलन रंगतरंग झाला. जो तो या कवितेच्या ओळी घेऊन फिरत होता. हाच सुर बहरला.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवयित्री उषाकिरण आत्राम यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख कवी अतिथी झाडीच्या बहिणाबाई प्रसिद्ध कवयित्री अंजनाबाई खुणे, संमेलनाध्यक्ष सदानंद बोरकर, प्रसिद्ध कवी मुन्नाभाई नंदागवळी, डॉ. कल्पना सांगोडे, डॉ. इंद्रकला बोपचे, वीणा डोंगरवार, खेमचंद रंगारी, चंद्रप्रकाश बनकर, तारका रुखमोडे, एकनाथ बुद्धे, महेंद्र सोनोने, नमिता मांडवकर, सुखदेव झोडे, मोतीराम दडवे आदी कविंनी कविसंमेलनात रंग भरला.

मराठी भाषा विभाग आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ अनुदानित श्री दुर्गा शिक्षण संस्थेद्वारा शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय पहिले झाडीपट्टी साहित्य संस्कृती संमेलन निमित्ताने या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते पुढे अंजनाबाई खुणे म्हणाल्या-

पुरुष असो की बाई, म्हातारा झाला की, काही खरा नाही... या ओळी सादर करुन जीवनाची घालमेल सांगितली. जीवनाच्या प्रसंगावरील ही कविता होती.

सदर संमेलन हे शिवप्रसाद सदानंद जायस्वाल या महाविद्यालयात पार पडले, (दि.२८ नोव्हेंबर) झालेल्या पहिले झाडीपट्टी साहित्य व संस्कृती संमेलन संपन्न झाले. तेव्हा अध्यक्षीय कवीता वाचतांना उषाकिरण आत्राम म्हणतात-

बाजारात काय घेऊ माय
काय घेऊ न काय खाऊ,
पोराले पाटीपुस्तक, आता कशी घेऊ... सादर करुन आपले मनोगत व्यक्त केले.

या कविसंमेलनात विदर्भातील १९ कवींनी वेगवेगळ्या आशयाच्या कवीता सादर केल्या. झाडीपट्टी भागातील साहित्य व विषयाच्या कवीतामधून आपले विचार व्यक्त केले. कविसंमेलनाचे संचालन गझलकार विनोद गहाणे यांनी केले तर आभार डॉ. योगीराज नगराळे यांनी मानले. यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १४५ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा

बी. बी. मेश्राम यांचे प्रतिपादन

ज्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कळले, त्यांनी आंबेडकरवादाकडे वळताना इतरांनाही वळविले पाहिजे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन आणि द ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक विधान म्हणजे मला केवळ स्वराज्य नको तर संपूर्ण स्वराज्य हवे. च्या ८० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित १४५ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेच्या साकेतनगर येथील कार्यालयात दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झाली.

अध्यक्षस्थानी मार्गदर्शन करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, इंग्रज गेले तर स्वराज्य मिळेल, परंतु जातीयता आणि अस्पृश्यतेचे उच्चाटन करून वंचितांना मुख्य प्रवाहात आणणारे संपूर्ण स्वराज्य बाबासाहेबांनी अपेक्षित केले होते. आज कोणत्या राजकीय पक्षाच्या जाहीरनाम्यात अशी भूमिका प्रतिबिंबित होते, हे ओळखूनच जनतेने निर्णय घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पुणे कराराच्या पार्श्वभूमीवर बोलताना बाबासाहेबांनी गांधींच्या भूमिकेवर केलेले भाष्य, राखीव जागेवरील निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या कामगिरीविषयी उपस्थित केलेले प्रश्न अद्याप अनुत्तरीत राहिल्याचे त्यांनी सांगितले. ज्यांना डॉ. बाबासाहेब समजले त्यांनी स्वतः आंबेडकरवादाकडे वळावे आणि इतरांनाही वळवावे. दर्जेदार प्रशिक्षणातून समाजाला आंबेडकरवाद समजावून देणे ही काळाची गरज आहे, असेही मेश्राम यांनी स्पष्ट केले.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते सुरेश चव्हाण म्हणाले की, परिवर्तनवादी चळवळ पुढे नेण्यासाठी एकजूट अत्यावश्यक आहे.

प्रमुख वक्ते अनामी मोरे यांनी प्रस्थापितांच्या स्वराज्यात आमच्यासाठी स्थान नव्हते म्हणून बाबासाहेबांनी संपूर्ण स्वराज्याची संकल्पना मांडली. ती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचली पाहिजे. असे मत व्यक्त केले.

उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, अहमदाबाद महानगरपालिकेच्या मानपत्राला उत्तर देताना बाबासाहेबांनी केलेले विधान आजही अत्यंत प्रासंगिक आहे. समाजात एकीचा अभाव पुढील काळात गंभीर परिस्थिती निर्माण करू शकतो, असे त्यांनी सांगितले. प्रा. शिवम गायकवाड यांनी स्वराज्य आणि संपूर्ण स्वराज्य यांतील मूलभूत फरक स्पष्ट करताना शिवरायांच्या राज्यकारभारातील मार्गदर्शक तत्त्वे बाबासाहेबांनी संविधानात कशी अंतर्भूत केली याचे विवेचन केले. कुमार वाघमारे यांनी स्वराज्य म्हणजे घर आणि संपूर्ण स्वराज्य म्हणजे सुरक्षित घर असे तर शैलेंद्र मिसाळ यांनी लोकशाहीची अंमलबजावणी ही खऱ्या स्वराज्याची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास उद्योजक मिलिंद बागुल, डॉ. व्ही. एच. कांबळे, अशोक मेश्राम यांची विशेष उपस्थिती लाभली. प्रारंभी आदर्शांना पुष्पांजली अर्पण करून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन ॲड. विलास रामटेके, प्रास्ताविक प्रा. विलास कटारे यांनी तर आभार उद्योजक मिलिंद बागुल यांनी मानले.